International Research Journal of Humanities, Language and Literature ISSN: (2394-1642)
Impact Factor 6.959 Volume 8, Issue 8, Aug 2021
Association of Academic Researchers and Faculties (AARF)
Website-www.aarf.asia, Email : editoraarf@gmail.com

# तथागत बुद्धांचा दार्शनिक संघर्ष: एक शोध

**डॉ.प्रकाश कांबळे,** सहाय्यक प्राध्यापक व मराठी विभाग प्रमुख, ए.डी.पी.एम.चे महिला महाविद्यालय, जळगाव

तत्त्वज्ञानाच्या जागतिक इतिहासामध्ये चैतन्यावाद व जडवाद किंवा अध्यात्मवाद विरुद्ध भौतिकवाद असे दोन तट आहेत.अर्थात भारतातही हेच दोन मुख्य तट आहेत .चैतन्यवाद पारलौकिक जगाचा विचार करते ,तर जडवाद इहलोकाचा विचार महत्त्वाचा आणि मुलभूत मानते.जगाची निर्मिती कशी झाली याच्याशी जडवादाला घेणेदेणे नाही ,तर हे जग स्वतःच्या पायावर कसे उभा राहील हे पाहणे तत्त्वज्ञानाचे काम असते हे जडवादाचे प्राणतत्त्व. म्हणूनच भारतीय विचारदर्शनातील पारंपरिक संघर्ष हा पश्चिमी परंपरेप्रमाणे अध्यात्मवाद विरुद्ध भौतिकवाद असा नसून तो ब्राह्मणी विरुद्ध अब्राह्मणीअसे असल्याचे पुरेसे स्पष्ट झालेले आहे. भारतातील एकूण तत्त्वविचार या दोन छावण्यामधील अंतरक्रियेमुळे निर्माण झालेला आहे हे लक्षात घेणे आवश्यक आहे.प्रस्तुत शोधनिबंधामध्येतथागत गौतम बुद्धांनी जो दार्शनिक संघर्ष केलेला आहे त्याचा विचार करावयाचा आहे.हे करत असतांना तथागतांचा संघर्ष कोणत्या दर्शनाशी झाला,या संघर्षाचे स्वरूप कसे होते व या संघर्षात त्यांनी कोणत्या शस्त्राचा अवलंब केला,याचा विचार केला जाणार आहे.

## बुद्ध:जमिनीतून उगवून आलेले दार्शनिक

एकूणच जडवाद्यांचे तत्त्वज्ञान मातीतून उगवून आलेले असल्यामुळे त्यांचे मातीशी,मातीतल्या सामान्य लोकांशी ऋणानुबंध होते.त्यांनी स्वतःभोवती तत्त्ववेत्याचा कोष विणलेला नव्हता.या संदर्भात गौतम बुद्ध आणि लोकायत यांचे उदाहरण सर्वश्रुत आहे." ही अब्राह्मणी तत्त्वज्ञाने केवळ वैचारिक क्षेत्रातच नव्हे तर सामान्य लोकातही बरीच पसरलेली असणार.एरवी त्यांना टक्कर देण्यासाठी चैतन्यवाद्यांना एवढा घाम गाळावा लागला नसता. "१ दरिद्री व दास यांची ब्राह्मणी तत्त्वाज्ञानांकडून फसवणूक होऊ नये म्हणून सर्व अब्राह्मणी तत्त्वज्ञाने कमालीची काळजी घेत.त्यांनी आपली नाळ सामान्य माणसाच्या हृदयात जोडलेली असल्यामुळेच त्यांना लोकांचे समर्थन मिळत होते.छ.शिवाजी महाराज सामान्य रयतेची,शेतकऱ्याची किती काळजी घेत होते,म.फुले यांचा शेतकऱ्याचा असूड,आणि सर्वच लेखन किंवा बाबासाहेबांचे मूकनायक, बहिष्कृत भारत,अथवा जनतेतील लेखन आणि भाषणेही वाचली तर लक्षात येते ही आमची महापुरुष कामाच्या प्रचंड व्यापातही किती बारीक सारीक गोष्टींची काळजी घेत होते.यावरून आपण अंदाज लावू शकतो की आमची प्राचीन तत्त्वज्ञाने सुद्धा इतक्याच ओथंबलेल्या हृदयाची असतील. त्याशिवाय का ही तत्त्वज्ञाने लोकतत्त्वाज्ञाने होऊ शकली?डॉ.आ.ह.साळुंखे यांच्याच भाषेत सांगायचे तर आपल्या धडावर आपलेच डोके ठेवण्याचा हा कार्यक्रम होता.आणि त्यात सर्वात अग्रभागी असलेले दर्शन म्हणजे बौद्ध दर्शन होय!

बुद्धकाळातील बहुतांश दार्शनिकावर आणि विचारवंतांवरही अध्यात्मवादाचा जबरदस्त पगडा बसला होता.आत्मज्ञान कसे होईल,सर्वसंगपरित्याग करून सन्यास कसा घेता येईल,तप करून प्रायश्चित कसे घेता येईल.हे प्रश्न सोडवण्यावरच या सर्वविचारवंतानी आपले लक्ष केंद्रित केले होते.मृत्यूनंतर पुनर्जन्म आहे की,नाही?आत्मा हा शरीरापेक्षा भिन्न आहे की नाही?हे प्रश्नच त्या काळी तत्त्वज्ञानाचे मुख्य प्रश्न बनले

© Association of Academic Researchers and Faculties (AARF)
A Monthly Double-Blind Peer Reviewed Refereed Open Access International e-Journal - Included in the International Serial Directories.

होते.'मात्र तथागत सामान्य माणसांच्या दु:खाशी तादात्म्य पावलेले होते.शाक्य आणि कोलिय यांच्यातील सतत होणारा संघर्ष हे सिद्धार्थ गौतमच्या परीव्रजेचे मुख्य कारण होते हे ही यानिमित्ताने लक्षात घेतले पाहिजे.जमिनीशी त्याची घट्ट नाळ जुळलेली होती.इतकेच कशाला आपले जमिनीशी किती घट्ट नाते आहे आणि आपल्या प्रत्येक विचार-कार्याला जमीनच साक्ष आहे हे 'मारला' सांगण्यासाठी तथागतांनी भूमिकडेच हात दर्शविला होता.त्यांची जगप्रसिद्ध भूमीमुद्राही याची साक्ष देते .मानवजातीला दुःखापासून मुक्त करण्याकरिता बुद्धाने स्वतःला अगदी इंच इंच झिजविलेले आहे हे त्यांचे संपूर्ण जीवनचरित्र पाहिल्यानंतर लक्षात यते.समता-स्वातंत्र्य-बंधुता यावर आधारलेली व्यवस्था निर्माण व्हावी यासाठी त्यांनी तत्कालीन ब्राह्मणी व्यवस्थेशी निकराची झुंज घेतली.

बुद्धाला समजून घेताना आपल्याकडून नकळतपणे आणखी एक चूक होते ती म्हणजे ''बुद्धाला ज्ञान प्राप्त झाल्यापासून अगदी शेवटच्या क्षणापर्यंत ते केवळ दु:ख मुक्तीचा मार्ग सांगत आणि धम्माचा प्रचार-प्रसार करत राहिले. 'वयाच्या साठीत त्याला मेंढकापासून दास मुक्तीचे ज्ञान झाल्यापासून त्याने व संघाने दासविमोचनचा 'पंचधम्म बहुजन मान्य केला.पण वयाच्या छत्तीसाव्या वर्षी त्याला प्रतीत्यसमुत्पादाचे ज्ञान झाल्यापासून साठीपर्यंतचा काळ केवळ दु:खमुक्तीच्या अध्यात्मिक आदेशात गेला नाही, तर प्रस्थापित वर्ण व नवोदित जात या व्यवस्थांच्या खंडनात गेला.वीस वर्षात त्याने निर्मिलेले समाजक्रांतीचे तत्त्वज्ञान,प्रबोधन व संघटन (संघ) याच्या जोरावर त्याने वर्णीय गणदास प्रथा नष्ट करायची क्रांती केली.'२ ही जगाच्या इतिहासातील अपूर्व अशी क्रांती होती.त्यांनी निर्माण केलेले तत्वज्ञान दार्शनिक म्हणून मान्यता मिळविण्यासाठी नव्हते. 'बुद्धांची ज्वलंत प्रेरणा ही तत्त्वज्ञानविषयक नव्हती तर गोरगरीब माणसाच्या दु:ख निवारणाची होती.''३ कमालीचे क्षमाशील आणि सर्व विकाराच्या पलीकडे गेलेल्या तथागताची प्रेरणा ही तत्त्वज्ञानविषयक कशी असू शकेल?

बहुजन समजाविषयीची तळमळ अखेरच्या क्षणापर्यंत कशी क्षीण झाली नाही याचे सुंदर विवेचन डॉ.आ.ह.साळुंखे यांनी केलेय ते असे,"आपल्या माघारी धम्मविनयच तुमचा शास्ता असेल,हे आनंदानं सांगितल्यानंतर त्यांनी भिख्कुंशी जो संवाद साधला तो अगदी हृदयस्पर्शी आहे.त्यांनी भिख्कुना शंका विचारण्यासाठी पुनःपुन्हाआणि वेगवेगळ्या पद्धतीने आग्रह केला.या प्रसंगात त्यांनी व्यक्त केलेली एक भावना तर अथांग करुणेने ओलावून गेलेली आणि तरीही तितक्याच ज्ञाननिष्ठेने उजळून निघालेली आहे असे जाणवते.आता शंका विचारली नाही,तर नंतर पश्चाताप करण्याची वेळ येईल,शंका असूनही आपण ती दवडली म्हणून आयुष्यभर चूटपुटलागून राहील;असे होऊ देऊ नका ,असे जणू काही वात्सल्याने ओतप्रोत भरलेले आवाहन त्यांनी भिख्कुना केले आहे.''४ यावरून तथागत लोकांशी आणि त्यांना दु;खमुक्त करण्याशी किती तादात्म्य पावले होते हे लक्षात येईल.'बुद्धाने निर्वाणाचे अंतिम क्षण पाजळून तो शेवटचा क्षण भिक्षू बनविण्यासाठी प्रकाशित केला.'अशा नितांत सुंदर शब्दात तथागतांचे हे तादात्म्य कॉ.शरद पाटील यांनी विशद केले आहे.हा दार्शनिक जमिनीतून उगवून आलेला/जमिनीशी घट्ट नाते असलेला असल्यामुळेच शेवटच्या क्षणापर्यंत त्यांचे सामान्य माणसाशी आणि त्याच्या दु:खाशी अभेद्य असे नाते होते.बुद्धांच्या दार्शनिक संघर्षाचा विचार करण्यापूर्वी त्यांनी हा संघर्ष कोणत्या शस्त्राच्या जोरावर केला त्याचा थोडक्यात विचार करू.

**तर्क : बुद्धाच्या महासंघर्षाचे प्रमुख शस्त्र :**

तथागत गौतम बुद्धांनी जी प्रचंड अशी क्रांती केली ती त्याच्याकडे असलेल्या प्रभावी शस्त्रामुळेच.मग काय होती ही शस्त्र ?तर त्यांनी निर्माण केलेले तत्त्वज्ञान उजेडाचे आणि मांगल्याचे तत्त्वज्ञान होतं.केवळ विचार चांगला असून चालत नाही,तर त्याचा प्रचार आणि प्रसारही तितक्याच प्रभावी पद्धतीने आणि वेगाने झाला पाहिजे त्यासाठी त्यांनी संघ निर्माण केला होता.त्यांची विचार समजावून सांगण्याची पद्धती विलाक्ष्ण अशी होती.आणि त्याच धर्तीवर त्यांनी आपला भिख्कू संघही तरबेज केला होता.''स्वतः बुद्धांचे व्यक्तिमत्व कमालीचे प्रभावी होते आणि त्यांची भाषा माणसे तोडणारी नव्हती,तर जोडणारी होती.'हर परिवर्तन का मूल विचारपरिवर्तन' यावर त्यांचा कमालीचा विश्वास होता.आणि दुसरे एक अतिशय महत्त्वाचे शस्त्र होते ते म्हणजे तर्क.ही सर्व त्यांची शक्तीस्थळे होती, ज्याच्या जोरावर ते महत्तम अशी क्रांती करू शकले.''५ त्याचा वेध थोडक्यत घेऊ या.कुठलाही बौद्ध ग्रंथ

वाचायला घेतला तर एक बाब समान दिसते ती म्हणजे भिख्कू मध्ये/अगदी उपसाकामध्येही वाद/प्रश्नोत्तरे होताना दिसतात.स्वतः तथागत अनेक प्रश्नाची सोडवणूक प्रश्नोत्तरे करून विविध उदाहरणांनी समजावून सांगत सम्यक भाषेत करतात. अशा प्रश्नोत्तराचा आणि तर्कपुर्ण विवेचनाचा अजोड असा नमुना म्हणून 'मिलिंद प्रश्न' हा ग्रंथ सर्वज्ञात आहे. या तर्काचा शोध घेतांना कॉ.शरद् पाटील म्हणतात,"वर्णव्यवस्थाक गणदास प्रथेविरुद्ध बुद्धाने निर्णायक संघर्ष उभारल्यानंतरच्या काळात तक्कट (तर्क) या शब्दाचा प्रथम अढळ होतो.हे अधिक स्पष्ट करण्यासाठी ते पुढील उदाहरण देतात,'महासेट्टी अनाथपिंडक मेल्यानंतर देवपुत्र होऊन रात्री बुद्धाच्या दर्शनाला आला आणि त्याने म्हटलेल्या गाथेत सारीपुत्ताची प्रशंसा केली दुसऱ्या दिवशी बुद्धाने भिक्षुंना रात्रीचा प्रसंग सांगताना अनाथपिंडकाचे नाव गाळले.आनंद म्हणाला, 'तो देवपुत्र जरूर अनाथपिंडक असला पाहिजे.कारण अनाथपिंडक सारीपुत्तावर अत्यंत प्रसन्न होता.'बुद्ध उद्गारला .'धन्य ,धन्य आनंद!जेवढे काही तर्काने मिळवायला पाहिजे तेवढे तू मिळवले आहेस."६

पुढे १९व्या शतकात म.फुले यांनी या तर्काचा अतिशय प्रभावीपणे वापर केलेला आहे.अशा बेजोड युक्तिवादासाठीचा अप्रतिम नजराणा म्हणून त्यांच्या 'गुलामगिरी' या ग्रंथाकडे पाहायला हरकत नाही.बुद्धाचा धम्म नुकताच सोडून गेलेल्या सुनक्खताने तर्काचा नकारात्मक अर्थ बुद्धावर लादलेला आहे.असे असले तरी "त्या अर्थाने बुद्धाने तर्काचा वापर कधीच केला नाही.वादात त्याने प्रतिपक्षियाचे जे अकाटय पराभव केले तेही नकारात्मक नव्हते,तर वर्णान्त्क समाज क्रांतीकडे नेणाऱ्या आपल्या तत्वज्ञानाचे सिद्धांत प्रतिपक्षियांना पटवण्याकरिता होते.हे विधायक वाद्कौशल्य त्याने आपल्यापुरते ठेवले नाही ,तर त्यात त्याने आपल्या भिक्षू-भिक्षुणीना,उपासक-उपसिकाना पारंगत केले."७ म्हणजेच उद्देशाशिवाय,विद्वत्तेचे प्रदर्शन करण्यासाठी अथवा समोरच्याची जिरवण्यासाठी बुद्धांनी हे वाद केलेले नाहीत,तर आपल्या महान उद्देशाच्या पूर्ततेसाठी बुद्धाना हे वाद खेळावे लागलेले आहेत.हे आपल्याकडील अनेक विद्वानांनी,फेसबुकवर वाह्यात चर्चा करणारांनी आणि 'आता कशी जिरवली'असे म्हणून आपलीच पाठ थोपटणारांनी व आपला अमुल्य वेळ नको तिथे खर्च करणारांनी हे लक्षात घ्यायला हवे.बुद्धाच्या या अनन्यत्वासंदर्भात संदर्भात प्रसिद्ध विचारवंत डॉ.आनंद तेलतुंबडे म्हणतात,"मानवी प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी बुद्धाने विश्लेष्णात्मक युक्तिवादाचा मार्ग अवलंबला.

तत्कालीनचिंतनशील समाधीचे पद्धतीशास्त्र वापरून त्याने मानवी अस्तित्वाबाबत अत्यंत मूलगामी सिद्धांत दिले.बौद्ध धर्माचे संपूर्ण सार या सिद्धांतामध्ये सामावलेले आहे.आपल्याला हे सिद्धांत बौद्ध तत्त्वज्ञानात अतिव्याप्त स्वरुपात सापडतात."८ 'म्हणूनच अगदी आजही विशुद्ध विज्ञानवादी आणि तर्कनिष्ठ तत्त्वज्ञान म्हणून संपूर्ण जग केवळ बुद्धाकडेच पाहते. बुद्धाने अडीच हजार वर्षापूर्वी हे तर्कशास्त्र विकसित करून आपल्या आंदोलनासाठी त्याचा प्रभावी शस्त्र म्हणून वापर केला हे केवळ विलक्षण असेच म्हणावे लागेल.तर्काचे महत्त्व प्रतिपादन करतांनाएच.ट्रुमन म्हणतात, "जे तर्क करत नाहीत ,ते धर्मांध आहेत.,जे तर्क करू शकत नाहीत,ते मूर्ख आहेत.जे तर्क करण्याचे साहस करत नाहीत ते गुलाम आहेत."९यानंतर गौतम बुद्धांनी तत्कालीन कालखंडात जो दार्शनिक संघर्ष केला त्याचा संक्षिप्त वेध या ठिकाणी घ्यावयाचा आहे.

**बुद्धाचा दार्शनिक संघर्षाचे दोन पदर :**

'बौद्ध'या दर्शनाच्या आणि हे दर्शन सर्वसामान्य माणसापर्यंत घेवून जाण्यासाठी निर्माण केलेल्या भिक्खू संघाच्या जोरावरच तथागत बुद्ध भारतात वर्णदास्य अंताची क्रांती करू शकलेले आहेत. जसा त्यांना तत्कालीन ब्राह्मणी व्यवस्थेने निर्माण केलेल्या अन्यायी व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करावा लागला तसाच विषम व्यवस्थेला तत्ववैचारिक अधिष्ठान देणाऱ्या दर्शनाविरुद्धही निकराची झुंज द्यावी लागलेली आहे.मात्र वेदनादायक गोष्ट अशी की ज्या इहवादी दर्शनानी तथागतांच्या खांद्याला खांदा लावून चैतन्यवादी दर्शनिकांशी महासंघर्ष करून त्यांना अक्षरशःघाम गाळायला लावला.त्या स्वकीय इह्वाद्यांशीही तथागताना प्रसंगी चार हात करावे लागलेले आहेत.म्हणजेच त्यांना हा दुहेरी असा दार्शनिक संघर्ष करावा लागलेला आहे. त्यामुळे तो अधिकच गुंतागुंतीचा होता. "बुद्धाच्या काळात त्याला

© Association of Academic Researchers and Faculties (AARF)

सोडून सहा तत्त्वज्ञानी होते.त्यांना तीर्थकर म्हटलेले आहे.एक महावीर,दुसरा मक्खली गोसल,तिसरा पुरण कस्सप,चौथा बेलठ्ठीपुत्त,पाचवा अजित केस्कम्बली,आणि सहावा पलुध कच्चान.त्यांच्यामध्ये महावीर सोडले तर बाकी सर्व उच्छेदवादी,नकारात्मक अर्थी आहेत.पाप नाही,पुण्य नाही,दान यज्ञ झुठ आहेत,परलोक नाही अशाप्रकारची मांडणी करतांना ते दिसतात.ते जसे उच्छेदवादी आहेत,तसे ते महावीरासह निरीश्वरवादीही आहेत.म्हणजेच ते अश्रद्ध अशाप्रकारची मांडणी करतात.पुरण कस्सप तर सांगतो की,एखाद्या माणसाने तलवार हाती घेऊन माणसाची कत्तल जरी केली तरी त्याला पाप लागणार नाही.महावीर सांगतो,शरीराला आजन्म क्लेश दिल्याने आत्माक्लेशातून,शेवटी प्रायोपवेशनाने आत्महत्येतून मोक्ष मिळतो,कैवल्य मिळते.

मक्खली गोसाल नियतीवादाचा उपदेश करतो तो सांगतो,मानवी जीवनाचे अगोदरच सर्व काही नियतीने ठरवून टाकलेले असते.कुठल्याही प्रकारे ते बदलू शकत नाही.पुरुषार्थाने जीवन बदलू शकत नाही ,हाही निराशावाद आहे. अजित केस्कम्बली हा त्यावेळचा भौतिकवादी आहे.त्यानेसुद्धा उच्छेदवादी पर्याय मांडला"१०ही तत्त्वज्ञाने वर्णव्यवस्था विरोधी असल्यामुळे अब्राह्मणी वर्गाला जवळची वाटणे साहजिक आहे.नव्हे;बहुजनाच्या मनाची पक्कडही या दर्शनानी घेतलेली होती.लोकायतचे उदाहरण सर्वश्रुत असेआहे.मात्र नैराशात्मक विचारामुळे समाजमन बदलतही नसते आणि त्याच्यात अन्यायाविरुध्द लढण्याचे सामर्थ्यही निर्माण होत नसते.बुद्धाला तर संपूर्ण मानवजातीबद्दल आणि त्याच्या दु:खाबद्दल केवळ सहानुभूतीच नाही तर अतीव करुणाही वाटत होती.त्याने अथक प्रयासाने दु:खाचे कारण आणि उपायही शोधला होता.त्याला दु:खमुक्त,भयमुक्त,वर्णमुक्त,अंधश्रद्धामुक्त,विषमतामुक्त असलेला समतावादी व विज्ञाननिष्ठ समाज निर्माण करायचा होता.एका बाजूला हे उच्छेदवादी तत्त्वज्ञान तर दुसऱ्या बाजूला वर्णव्यवस्थेचे समर्थन करणारे वेदांत /उत्तर मिमांसा/पूर्व मिमांसा/न्याय /वैशेषिक ब्राह्मणीकृत सांख्य योग ही अलौकिकवादी ब्राह्मणी तत्त्वज्ञाने आहेत.पृथ्वीविषयी आणि पृथ्वीवरील माणसाच्या दु:खाविषयी ही तत्त्वज्ञाने ब्र शब्द काढत नाहीत.उलट हा अब्राह्मणी माणूस अधिकाधिक अंधश्रध्द आणि परावलंबी कसा बनेल याची ते काळजी घेतात.या तत्त्वज्ञानाचा पुरस्कार करण्यात ब्राह्मण वर्णाचा पुढाकार आहे. हे तत्त्वज्ञान वर्णव्यवस्था कायम राहण्यासाठी प्रयत्नशील आहे.समता स्वातंत्र्य आणि बंधुत्वाचे निस्सीम चाहते असलेल्या तथागतांचा यांच्याशी अटळ असा संघर्ष आहे.म्हणून पाटील म्हणतात,"एका बाजूला वर्णव्यवस्थेचे जे समर्थक आहेत त्यांच्या ईश्वरवादाला विरोध आणि दुसऱ्या बाजूला जे निराशावादी आणि उच्छेदवादी आहेत त्यानाही विरोध अशा प्रकारे बुद्धाच्या तत्त्वज्ञानाचे दुहेरी कार्य आहे."११बुद्धाने हा विरोध फार सम्यकपणे केला.तरीही आपल्या भूमिकेशी अजिबात तडजोड केली नाही.

बुद्ध सांगतात, हे दोन्ही टोके टाळली पाहिजेत.कोणती दोन टोके?तथागताच्याच शब्दात पाहू,"कामोपभोगामध्ये आसक्त होणे आणि स्वतः ला क्लेश देणे,ही दोन्ही टोके टाळणारा मध्यम मार्ग स्वीकारा."१२ आणि हाच मार्ग स्विकारून अतिशय आर्जवी भाषेत तरीही उत्पात घडवणारा संघर्ष तथागतांनी केला.समता-स्वातंत्र्य-बंधुत्व आणि न्यायावर आधारित समताधिष्ठित समाजारचणेसाठी,उमदा समाज घडवण्यासाठी उपरोक्त दोन्ही तत्त्वाज्ञाशी संघर्ष करणे तथागताना अटळ आणि आवश्यक वाटले.मात्र हा संघर्ष करतान त्याचे उमदेपण कणभराने कमी तर सोडाच ते अधिकच वाढत गेले. म्हणून तर बुद्ध सगळयांना हवाहवासा वाटतो.ज्यांना कोणाला तो शत्रूप्रमाणे वाटतो त्यानेही जर डोळ्यावरचा पडदा बाजूला सारून स्वच्छ नजरेने त्याचाकडे पाहिले तर,तोही बुद्धाला मायेचे कडाडून आलिंगन दिल्याशिवाय राहणार नाही.

**संदर्भ**


१. कांबळे प्रकाश.अब्राह्मणी योद्धा कॉ.शरद पाटील,लोकायत प्रकाशन,सातारा,पुनर्मुद्रण१२ एप्रिल २०२२,पृ.क्र६५
२. पाटील शरद , जातीव्यवस्थाक सामंती सेवकत्त्व,पृ.क्र.१२६
३. उनि, जातीव्यवस्थाक सामंती सेवकत्त्व,पृ.क्र.१४४
४. साळुंखे आ.ह.सर्वोत्तम भूमिपुत्र : गोतम बुद्ध ,लोकायत प्रकाशन,सातारा,बारावे पुनर्मुद्रण,२०१९,पृ.क्र.१३४

५. उनि,अब्राह्मणी योद्धा कॉ.शरद पाटील,लोकायत प्रकाशन,सातारा,पुनर्मुद्रण१२ एप्रिल २०२२,पृ.क्र७०
६. उनि,जातीव्यवस्थाक सामंती सेवाकत्त्व,पृ.क्र.१४३ वरुन उधृत
७. तत्रैव,पृ.क्र.१४४
८. तेलतुंबडे आनंद,बुद्धाविचार : मार्क्सवादी दृष्टीक्षेप, लोकवाङ्मय गृह,मुंबई,चौथी आ.२०११ पृ.क्र.०७
९. खरात विलास,मनुच्या ब्राह्मणी कायद्याची संहितामनुस्मृती,खंड दुसरा ,मूलनिवासी पब्लिकेशन ट्रष्ट,नवी दिल्ली,पृ.क्र.६६ वरुन उधृत
१०.पाटील शरद्,भारतीय तत्त्वज्ञान व नास्तिक मत ,लोकसाहित्य प्रकाशन,औरंगाबाद,प्र.आ.२०१३,पृ.क्र.१९
११.तत्रैव,पृ.क्र.२०
१२.तत्रैव,पृ.क्र.४४